स्थापना १९९७

# पारिजात

## को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

नोंदणी क्रमांक : टी.एन.ए.(टी.एन.ए.) / आर.एस.आर./ सी.आर./९५१/९७

प्रशासकीय कार्यालय : पारिजात भवन, प्लॉट नं १८, सेक्टर १० ए, नेरुळ, नवी मुंबई - ४०० ७०६.




# १४ वा वार्षिक अहवाल सन २०१०-११

# विद्यमान संचालक मंडळ


श्री. कृष्णा पां. धुमाळ
अध्यक्ष


श्री. श्रीपती शं. गरुड
उपाध्यक्ष


श्री. बाळासाहेब वि. ताकवले
सचिव


श्री. दिपक शं. टेळे
खजिनदार


श्री. कैलास वि. खोपडे
संचालक


श्री. दशरथ आ. बडदे
संचालक


श्री. अनंत ना. प्रभाळे
संचालक


श्री. अमृत दा. पाटील
संचालक


श्री. आनंदा बा. आंबवले
संचालक


श्री. शंकर रा. पुली
संचालक


सौ. मंदा ज्ञा. खोपडे
संचालिका


श्री. सचिन य. रणनवरे
कर्मचारी प्रतिनिधी


श्री. विजय बं. मोरे
मुख्य कार्य. अधिकारी

# पारिजात को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई

रजि.नं.: टी.एन.ए./टी.एन.ए./आर.एस.आर./सी.आर. ९५१/९७

**प्रशासकीय कार्यालय :** पारिजात भवन, प्लॉट नं. १८, सेक्टर १० ए, नेरुळ (प.), नवी मुंबई - ४०० ७०६.

## चौदाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यांत येते की, पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई या संस्थेची **चौदावी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक ०७ / ०८ / २०११ रोजी सकाळी १०.०० वाजता गुरव ज्ञाती भवन, २-सी / ३, सेक्टर ९-ए, बस डेपोजवळ, वाशी, नवी मुंबई** या ठिकाणी संस्थेचे अध्यक्ष श्री. कृष्णा पां. धुमाळ यांच्या अध्यक्षतेखाली खालील नमूद केलेल्या विषयांचा विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सर्व सन्माननीय सभासदांनी वेळेवर उपस्थित राहून कामकाजात भाग घ्यावा ही विनंती.

### सभेपुढील विषय

१) दि. ०१/०८/२०१० रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) दि. ३१ मार्च २०११ अखेरचा कार्यकारी मंडळाने सादर केलेले ताळेबंद पत्रक व नफा तोटा पत्रकास मंजूरी देणे.

३) मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०१०-२०११ नफा विभागणीस मंजुरी देणे.

४) सन २०१०-२०११ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालास मंजुरी देणे.

५) सन २०११-२०१२ सालाकरिता अंतर्गत हिशेब तपासणीसाची नेमणूक करून मानधन ठरविणे.

६) सन २०११-२०१२ च्या अंदाज पत्रकास मंजूरी देणे.

७) मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

ठिकाण : नवी मुंबई
दिनांक : १५/०७/२०११

संचालक मंडळाच्या वतीने
**बाळासाहेब विश्वास ताकवले**
(सचिव)

### विशेष सूचना

१) गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास, ठरलेल्या वेळेनंतर अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी ही सभा घेण्यात येईल व त्या सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

२) ज्या सभासदांना प्रश्न विचारावयाचे असतील अगर सुचना करावयाच्या असतील त्यांनी नियोजित सभेच्या तारखेपूर्वी सात दिवस अगोदर संस्थेच्या कार्यालयात लेखी कळविणे आवश्यक आहे.

३) सभेस येताना अहवालाची प्रत बरोबर आणावी.



# "सामर्थ्य आहे चळवळीचे, जो जो करील तयाचे"!

सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनो,

आपल्या संस्थेच्या १४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने आपणा सर्वांचे मनःपूर्वक स्वागत ! माझा हा तुमच्याशी अध्यक्ष म्हणून पहिलाच संवाद आहे. बोलण्या व लिहण्यापेक्षा प्रत्यक्ष कृतीवर माझा जास्त विश्वास आहे. हा अहवाल आपल्या हाती देताना मागील १३ वर्षातील वाटचालीकडे वळुन पाहिले असता, संस्थेने केलेल्या भरीव प्रगतीबाबत मन अभिमानाने भरुन येते. या अल्प कालावधितच संस्थेच्या नऊ शाखा व स्वमालकीचे प्रशासकीय कार्यालय असा विस्तार झाला आहे. संस्थेने ३१ मार्च २०११ अखेर एकूण संमिश्र व्यवसायाचा रु. ७०.०० कोटीचा टप्पा पूर्ण केला आहे.

१९९७ साली रुजवलेली कल्पना प्रत्यक्षात अवतरली, विस्तारली, बहरली तिला लोकमान्यता व प्रतिष्ठा प्राप्त झाली. सर्वांच्या कौतुकास प्राप्त झालेली **"पारिजात संस्था"** प्रगतीचे नवनविन टप्पे यशस्वीरित्या पार पाडत आहे. या कामी मला बॅकींग क्षेत्राचा अनुभव असलेले व सामाजिक जाण असणारे माझे सेवाभावी सहकारी संचालक, प्रशिक्षीत व कार्यतत्पर अधिकारी व कर्मचारी वर्ग आणि दैनंदिन ठेव प्रतिनिधी यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.

अर्थिक वर्षाच्या सुरुवातीला स्पर्धेची काही वादळे घोंगावत आहेत. स्पर्धेच्या वादळांना तोंड देण्याचे सामर्थ्य आपल्यात आहेच. परंतु सहकारी संस्थेची मजबुती आणि अर्थिक सक्षमता यासाठी नियंत्रकाची बदलणारी भुमिका, बदल होऊ घातलेला सहकारी कायदा, येणारा आयकर कायदा आणि त्यातील तरतुदी ही सारी वादळे आपणांस अंगावर घ्यावयाची आहेत.

१७ व्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या व्यक्तीमत्वाच्या जोरावर आणि योजनाबध्द अविरत श्रमाने स्वराज्य स्थापन्यासाठी देशभक्तीची भावना प्रज्वलीत केली. कौशल्य, चातुर्य आणि साहस या गुणांवर त्यांनी राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक शक्ती स्वराज्य स्थापनेसाठी एकत्रीत केल्या. त्यामुळे ते आपल्या काळातील **'युगप्रवर्तक'** ठरले. अशाच प्रकारची भावना प्रत्येक सभासदाच्या मनामध्ये जागृत झाली तर सहकारी संस्थांना किंबहुना सहकारी चळवळीला सुवर्णदिन येण्यास फारसा वेळ लागणार नाही. फक्त गरज आहे ती सभासदांची संस्थेबद्दल असणारी अस्था, निष्ठा, सामाजिक बांधिलकीची भावना आणि विश्वास असण्याची. तर आणि तरच हा सहकाराचा डोलारा मानाने आणि डौलाने उभा राहून सामान्य माणसाचे जिवनमान उंचावेल यात शंका नाही. म्हणूनच श्री समर्थ रामदासांच्या संदेशानुसार म्हणावेसे वाटते... **"सामर्थ्य आहे चळवळीचे, जो जो करील तयाचे"**!

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**

आपला सहकारी

**कृष्णा धुमाळ**

(अध्यक्ष)

## १४ वा वार्षिक कार्य अहवाल सन २०१०-२०११

सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो,

संस्थेच्या संचालक मंडळाच्या वतीने दिनांक ३१ मार्च २०११ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा १४ वा वार्षिक अहवाल, ताळेबंद पत्रक व नफा - तोटा पत्रक आपणासमोर सादर करताना आम्हास कर्तव्यपूर्तीचा विशेष आनंद होत आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षीसुद्धा संस्थेने आपल्या प्रगतीची वाटचाल ठरवून दिलेल्या उद्दिष्टानुसार चालू ठेवलेली आहे.

अहवाल वर्षात संस्थेने केलेल्या प्रगतीची व कामकाजाची कल्पना पुढील आकडेवारीवरून येईल.

### संस्थेची वित्तीय स्थिती :-

(रू. लाखात)

| तपशिल | ३१/०३/२०१० रु. | ३१/०३/२०११ रु. | वाढ रु. | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| भाग भांडवल | १३५.८० | १५७.८९ | २२.०९ | १६.२७ |
| राखीव व इ. निधी | १४७.२८ | १७८.८३ | ३१.५५ | २१.४२ |
| सभासद ठेवी | २९२४.१७ | ३४९७.६९ | ५७३.५२ | १९.६१ |
| गुंतवणूक | ७२८.२६ | ९०२.६२ | १७४.३६ | २३.९४ |
| सभासद कर्जे | २१६२.२२ | २६३१.३४ | ४६९.१२ | २१.७० |
| खेळते भांडवल | ३२६५.३५ | ३९२१.५२ | ६५६.१७ | २०.०९ |

पारिजात संस्थेने सहकारी तत्वाचा पूर्ण सन्मान राखून आपल्या आर्थिक व सामाजिक सेवेने आम जनतेमध्ये विश्वासाची, सहकाराची, विकासाची भावना निर्माण केली आहे. सभासद ठेवीदार व हितचिंतक यांच्या सहाय्याने व निःस्वार्थीपणे केलेल्या अव्याहत परिश्रमामुळे संस्थेने आपल्या प्रगतीची उद्दिष्ठे व आर्थिक धोरणे जोपासली असून केलेली प्रगती नेत्रदिपक आहे. याबद्दल आपले दुमत होणार नाही याची आम्हाला खात्री आहे.

## संस्थेच्या प्रगतीचा विस्तृत आढावा

### सभासद :- ५५७१

गतवर्षी संस्थेचे ५३४५ सभासद होते, अहवाल वर्षात ४४३ नवीन सभासद झाले आणि २१७ सभासदांनी राजीनामा दिल्यामुळे अहवाल वर्षाअखेर ५५७१ सभासद संख्या झाली आहे.

### भाग भांडवल :- रु. १५७.८९ लाख

संस्थेचे अधिकृत भागभांडवल रुपये पाच कोटी असून गतवर्षाअखेर संस्थेचे वसुल भागभांडवल रु. १,३५,७९,९००/- इतके होते. त्यामध्ये अहवाल वर्षात रु. २२,०८,९००/- ने वाढ होऊन दि. ३१ मार्च २०११ अखेर संस्थेचे वसुल भागभांडवल रु. १,५७,८८,८००/- इतके आहे.

## गंगाजळी व इतर निधी :- रु. १७८.८३ लाख

संस्थेची जनमानसात असलेली विश्वासार्हता ही संस्थेच्या स्वनिधीवर अवलंबून असते. निधी जेवढा जास्त तितका संस्थेचा पायाही मजबूत असतो, त्यानुसार संस्थेने राखीव निधी, इमारत निधी, संशयित व बुडीत कर्ज निधी, थकित व्याज निधी, लाभांश समानिकरण निधी, सभासद कल्याण निधी, धर्मादाय निधी, आकस्मिक निधी, सेवक कल्याण व प्रशिक्षण निधी उभारलेले आहेत.

गतवर्षाचे संस्थेचे एकूण स्वनिधी रु. १,४७,२७,९६९/- होते त्यामध्ये अहवाल साली रु. ३१,५५,१९२/- ने वाढ होऊन वर्षाअखेरीस एकूण स्वनिधी रुपये १,७८,८३,१६१/- इतका झाला आहे.

## ठेवी :- रु. ३४९७.६९ लाख

संस्थेच्या ठेवी संकलनामध्ये अहवाल वर्षात नेत्रदीपक वाढ झाली आहे. संस्था देत असलेली ग्राहक सेवा तसेच आपणा सर्वांचा दृढ विश्वास यामुळेच हे साध्य होऊ शकले.

गतवर्षाअखेर ठेवी रु. २९,२४,१६,८२७/- होत्या. त्यामध्ये रु. ५,७३,५२,००६/- ने वाढ होऊन दि. ३१ मार्च २०११ अखेर संस्थेच्या एकूण ठेवी रु. ३४,९७,६८,८३३/- झाल्या असून ठेवी वाढीचे प्रमाण १९.६१% इतके आहे.

संस्थेने ठेवीदारांकरिता विविध आकर्षक ठेव योजना बनविल्या असून प्रत्येक सभासदांनी ठेव योजनेत पैसे गुंतवून लाभ घ्यावा. संस्थेच्या विविध योजनांमध्ये अहवाल वर्षाअखेर खालीलप्रमाणे ठेवी जमा झालेल्या आहेत व त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| ठेवीचा प्रकार | सन २००७-०८ | सन २००८-०९ | सन २००९-१० | सन २०१०-११ |
|---|---|---|---|---|
| बचत ठेव | १,९५,३०,०७४ | १,८३,२८,६४० | २,५८,२३,६०९ | २,९८,७६,१६० |
| दैनंदिन बचत ठेव | ४,३०,६९,७६५ | ५,५९,३०,४७२ | ६,२८,९०,१३५ | ७,५१,६४,९७९ |
| अल्प मुदत ठेव | १,७६,४८,३६३ | २,३८,५१,२१३ | ४,३६,४१,३९४ | ६,२६,३४,४५३ |
| मुदत ठेव | २,३०,६५,८७१ | ३,३०,६४,५१० | ४,१३,०६,४०० | ५,६६,६३,०५४ |
| दामदुप्पट ठेव | १,६५,४३,८९६ | १,९९,४८,३९८ | १,७४,१८,१३४ | १,९९,३०,६५४ |
| पारिजात बक्षीस ९८ | ५७,५१५ | ३९,३२८ | ३४,२९६ | ३४,२९६ |
| पारिजात बक्षीस ०० | २,१२,००३ | १,७८,००३ | १,७६,००३ | १,७६,००३ |
| संकल्प सिध्दी ठेव | २८,२३,४१० | ३०,१९,४६४ | ३२,४४,१३७ | २०,४६,०१५ |
| सिध्दी ठेव | १,१६,००० | ७६,००० | ५६,००० | ४४,००० |
| मासिक प्राप्ति ठेव | १,५९,२०,९५० | १,९०,१८,०७५ | २,३२,५२,१२५ | ३,७३,३६,७२५ |
| आवर्त ठेव | १३,६६,८१८ | १६,७३,६९९ | २५,७६,१११ | २७,०३,४५७ |
| सभासद ठेव | २९,५०,५७२ | २८,७३,६९८ | ३०,२०,५३० | ३०,५३,४७१ |
| शुभकार्य ठेव | २,७२,७३,८१६ | ३,१०,३५,४५७ | ३,८८,७३,९९३ | ४,३७,४४,१२३ |
| धनवृद्धी ठेव | १,५४,५५,९१० | १,४३,८३,९६८ | १,३५,८६,४२२ | ११,६०,५६२ |
| धनलक्ष्मी ठेव | --- | १,७३,९५,२३८ | १,६५,१७,५३८ | १,४१,७१,७९० |
| शुभलक्ष्मी ठेव | --- | --- | --- | १०,२९,०९१ |
| एकूण रु. | १८,६०,३४,९६३.०० | २४,०८,१६,१६३.०० | २९,२४,१६,८२७.०० | ३४,९७,६८,८३३.०० |

## गुंतवणूक :- रु. ९०२.६२ लाख

महाराष्ट्र शासनाच्या सहकार खात्याने निधींच्या गुंतवणूकीबाबत घालून दिलेल्या सर्व नियमांचे योग्य प्रकारे पालन केलेले आहे. गतवर्षी संस्थेची गुंतवणूक रु. ७,२८,२६,२२७/- एवढी होती. अहवाल वर्षात त्यात रु. १,७४,३५,८६७/- ने वाढ होऊन एकूण गुंतवणूक रु. ९,०२,६२,०९४/- एवढी आहे. या वाढीचे शेकडा प्रमाण २३.९४% एवढे आहे.

| गुंतवणूक तपशील | रक्कम रुपये |
|---|---|
| दि ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक लि. भाग | १,०००.०० |
| महा.रा.सह.पत.फेड.लि. भाग | ३,०००.०० |
| राखीव निधी (रिझर्व फंड) | ५०,७७,१५८.०० |
| संशयित व बुडित कर्ज निधी | २५,८९,५६९.०० |
| लाभांश समानिकरण निधी | २,११,६६३.०० |
| सभासद कल्याण निधी | ६५,२१५.०० |
| सेवक कल्याण निधी | ६०,९६२.०० |
| धर्मादाय निधी | ५९,०००.०० |
| मुदत ठेव गुंतवणूक | ८,२१,९४,५२७.०० |
| एकूण रु. | ९,०२,६२,०९४.०० |

## कर्जे :- रु. २६३१.३४ लाख

सहकार खात्याच्या मार्गदर्शक सूचनांनुसार छोट्या व मोठ्या व्यावसायिक, व्यापारी व नोकरदार सभासदांच्या आर्थिक उन्नतीसाठी व त्यांच्या जीवनावश्यक गरजा भागविण्यासाठी आपली संस्था सदैव कटिबद्ध आहे. म्हणूनच कर्ज वाटपाच्यावेळी सर्वसामान्य सभासदांना आम्ही नेहमी अग्रक्रम दिलेला आहे व त्यांना प्राधान्याने कर्ज पुरवठा करून सभासदांचे राहणीमान उंचविण्याचा प्रयत्न केलेला आहे. कर्जदारांनी कर्जाची नियमित परतफेड करावी अशी संस्थेची अपेक्षा असते.

गतवर्षाअखेर संस्थेचे रु. २१.६२,२१,६६७/- कर्ज येणे बाकी होते अहवाल सालामध्ये संस्थेने सभासदांना रु. २०,९८,४३,८३९/- नव्याने कर्ज वाटप केले असून रु. १६,२९,३१,१२८/- कर्ज वसूल झालेले आहे. अहवाल वर्षाअखेरीस एकूण रु. २६,३१,३४,३७८/- कर्ज येणे बाकी आहे.

## कर्ज थकबाकी - प्रमाण २.०४ %

संस्थाच्या थकबाकी संदर्भात महाराष्ट्र शासनाच्या सहकार खात्यातर्फे सांगितलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार संस्थांनी थकबाकी ही ५% पेक्षा कमी असणे आवश्यक आहे. याबाबत आपल्या संस्थेने योग्य कारणासाठी योग्य तारण घेऊन उत्तम प्रकारे कर्ज वाटप केल्यामुळे थकबाकी मर्यादीत ठेवण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले आहेत.

मार्च २०११ अखेर येणे कर्जाशी थकीत कर्जाचे शेकडा प्रमाण **२.०४%** आहे. गतवर्षीच्या तुलनेत कर्ज थकबाकीचे शेकडा प्रमाण **१.१२%** ने कमी झाले आहे.

## अनुत्पादक मालमत्ता (N.P.A.) व तरतूदी :-

बँकींग व्यवसायात कर्जास मालमत्ता असेही संबोधले जाते. या मालमत्तेपासून (कर्जापासून) संस्थेस उत्पन्न न मिळाल्यास अशा मालमत्तेस 'अनुत्पादक मालमत्ता' (Non Performing Asset) असे म्हणतात व त्याची वेगळी वर्गवारी करावी लागते. ज्याप्रमाणे रिझर्व्ह बँकेने सर्व बँकांना एन.पी.ए. ची वर्गवारी करण्याचे बंधन घातले. त्याचप्रमाणे मा. सहकार आयुक्त व निबंधक, महाराष्ट्र यांचे आदेशानुसार दि. ३१ मार्च २००६ पासून पतसंस्थांना सुद्धा एन.पी.ए. निकष लागू केले व अनुत्पादक कर्जांची कालावधीनुसार तरतूद संस्थेच्या नफ्यातून करण्याचे बंधन घातले आहे.

आपल्या संस्थेचे दि.३१ मार्च २०११ अखेर निव्वळ एन.पी.ए.चे प्रमाण ३.९०% आहे. मा. सहकार आयुक्तांच्या परिपत्रकानुसार निव्वळ एनपीएचे प्रमाण हे १५% पेक्षा कमी असणे आवश्यक आहे. सदर अनुत्पादीत कर्जांची संस्थेने १००% पेक्षा अधिक तरतूद केलेली आहे. दि. ३१ मार्च २०११ अखेर अनुत्पादीत कर्जाची तरतूद खालील प्रमाणे आहे.

(रू. लाखात)

| अ.क्र. | कर्जाचे वर्गीकरण | येणे कर्ज रक्कम | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | **उत्पादित जिंदगी** | २५०३.०३ | गरज नाही |
| २. | **अनुत्पादीत जिंदगी** | | |
| | अ) सर्वसधारण जिंदगी | ६९.६८ | ३.४८ |
| | ब) संशयीत जिंदगी | ५८.६३ | १७.१५ |
| | क) बुडीत जिंदगी | --- | --- |
| | **एकूण** | **२६३१.३४** | **२०.६३** |

एन.पी.ए. साठी आवश्यक तरतुद रु. २०.६३ लाख असताना संस्थेने स्वेच्छेने प्रत्यक्ष तरतूद रु. २६.६० लाख इतकी केली आहे. तसेच संस्थेने चालु आर्थिक वर्षात **'उत्पादित जिंदगी'** (Performing Asset) वर ऑडीट निकषाप्रमाणे (०.२५% प्रमाणे) तरतूद रु. ६.३० लाख इतकी केली असून संस्थेची स्थिती अधिकाधिक भक्कम केली आहे हे आपणास कळविण्यास आनंद वाटतो.

## खेळते भांडवल :- रु. ३९२१.६८ लाख

गतवर्षाअखेर संस्थेचे खेळते भांडवल रु. ३२६५.३५ लाख एवढे होते. अहवालवर्षी संस्थेने सर्व क्षेत्रात भरीव कामगिरी केल्यामुळे खेळते भांडवल २०.०९% प्रमाणे रु. ६५६.१७ लाखाने वाढून रु. ३९२१.५२ लाख इतके झाले आहे.

## संचालक मंडळ सभा :-

संस्थेचा कारभार गतीमान होण्यासाठी अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या एकूण १५ सभा होऊन एकूण २५३ ठराव पारीत करण्यात आले. तसेच कर्ज मंजुरी समितीच्या मुंबई व पुणे विभागाच्या एकूण २३ सभा झालेल्या आहेत. त्याचबरोबर कर्जवसूली समिती, कर्मचारी विषयक समिती व नियोजन समितीच्या सभा आवश्यकते नुसार वेळोवेळी घेतल्या गेल्या.

## कर्मचारी व संचालक प्रशिक्षण :-

अहवाल वर्षात संस्थेने आपल्या कर्मचाऱ्याना महाराष्ट्र राज्य सहकारी संघ यांचे अंतर्गत ठाणे जिल्हा सहकारी बोर्ड लि., तसेच पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., बृहन्मुंबई नागरी सह. पत. फेडरेशन मर्या., व यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे यांच्या मार्फत चालविण्यात येणाऱ्या प्रशिक्षण वर्गात सहभागी होण्यासाठी अधिकारी वर्गातील व लिपीक वर्गातील कर्मचाऱ्यांना टप्पा टप्याने पाठविले. महाराष्ट्र शासनाच्या सहकारी खात्यातर्फे घेण्यात आलेल्या जी.डी.सी. ॲन्ड ए परिक्षेमध्ये संस्थेच्या आठ कर्मचाऱ्यांनी पदवी प्राप्त केली आहे.

## नफा विभागणी :- रू. ३१.८६ लाख

अहवालसाली एकुण खर्च व नियमानुसार कराव्या लागणाऱ्या तरतूदी वजा जाता रू. ३१,८५,३०९.५८ नफा झालेला असून गतवर्षीचा शिल्लक नफा रू.८०५.२७ मिळुन नफा रू.३१,८६,११४.८५ आहे. सदर नफ्याची विभागणी पुढीलप्रमाणे करण्याची शिफारस संचालक मंडळ करीत आहे. त्यास आपण मंजुरी द्यावी. ही नम्र विनंती.

| तपशील | रक्कम रुपये |
|---|---|
| राखीव निधी (२५% प्रमाणे) | ७,९७,000.00 |
| लाभांश (६% प्रमाणे) | ८,१४,७९४.00 |
| इमारत निधी | ५,00,000.00 |
| बुडित कर्ज निधी | ६,00,000.00 |
| लाभांश समानिकरण निधी | ५0,000.00 |
| रौप्य महोत्सव निधी | २0,000.00 |
| सभासद कल्याण निधी | २0,000.00 |
| कर्मचारी कल्याण निधी | १४,000.00 |
| सहकार प्रशिक्षण निधी | २0,000.00 |
| आकस्मिक निधी | ३,५0,000.00 |
| पुढील वर्षासाठी शिल्लक नफा | ३२0.८५ |
| एकूण रु. | ३१,८६,११४.८५ |

## लेखापरिक्षण :-

संस्थेचे सन २०१०-११ या अर्थिक वर्षाचे वैधानीक लेखापरिक्षण श्री. व्ही.जी.शिंदे (चार्टर्ड अकौंटट) यांनी केले. त्यांनी संस्थेच्या कामकाजाबद्दल गौरवोद्‌गार काढले व संस्थेस **"अ"** वर्ग प्रदान केला. तसेच संस्थेचे सन २०१०-११ या आर्थिक वर्षाची अंतर्गत हिशोब तपासणी श्री. बी. आर. सावंत ॲड कं. चार्टर्ड अकौटंट यांनी केलेली असून त्यांनी संस्थेच्यां कामकाजाबाबत वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन केले. याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

## उल्लेखनीय बाबी :-

संस्थेने अहवाल वर्षात जे उल्लेखनीय उपक्रम राबविले त्याचा तसेच अन्य बाबींचा थोडक्यात परामर्श खालीलप्रमाणे :-

### १) सभासदांसाठी पॅनकार्ड सुविधा :

संस्थेने आपल्या सभासद - खातेदार यांचेसाठी भारत सरकारच्या आयकर विभागामार्फत दिले जाणारे पॅनकार्ड पारिजात संस्थेमार्फत देण्याबाबत सामजस्य करार केला. त्यामुळे पारिजात संस्थेच्या सभासद ठेवीदारांना पॅनकार्ड आता संस्थेमार्फत देण्याची सुविधा करण्यात आली. अशा प्रकारे पॅनकार्ड सुविधा पतसंस्थेच्या माध्यमातून देणारी **"पारिजात"** ही एकमेव व प्रथम संस्था आहे.

### २) वेस्टर्न युनियन मनी ट्रान्सफर एजन्सी (Western Union) :

जगातील २०८ देशात राहणाऱ्या भारतीयांकडुन देशात पाठविण्यात येणाऱ्या पैशाचे विनिमय केंद्र पारिजात को-ऑप. क्रेडीट सोसायटी मध्ये करण्यात येत आहे. वेस्टर्न युनियन (Western Union) तर्फे नवी मुंबईतील पतसंस्थामध्ये अशी सुविधा उपलब्ध होण्याचा मान सर्वप्रथम **"पारिजात"** संस्थेने मिळविला आहे.

### ३) महिला दिन व जेष्ठ नागरीक दिन :

दि. ८ मार्च २०११ रोजी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधुन संस्थेच्या सर्व शाखामध्ये महिला दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी संस्थेच्या महिला कर्मचारी, महिला ठेव प्रतिनिधी तसेच महिला खातेदारांना पुष्पगुच्छ देऊन त्यांना सन्मानीत करण्यात आले. त्याचप्रमाणे दि. ०१ ऑक्टोबर २०१० रोजी जेष्ठ नागरीक दिन विभागीय स्तरावर साजरा करण्यात येऊन संस्थेच्या जेष्ठ खातेदार, सभासद यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

### ४) अधिकारी - पदाधिकारी प्रशिक्षण शिबिर :

संस्थेच्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी संस्थेने प्रशासकिय कार्यालय नेरुळ येथे स्वतःचे प्रशिक्षण केंद्र चालु केले आहे. सदर प्रशिक्षण केन्द्रामध्ये महाराष्ट्र राज्य सह संघा मर्यादित पूणे अंतर्गत ठाणे जिल्हा सहकारी बोर्ड कल्याण यांचेमार्फत दि. १५ व १६ जानेवारी २०११ रोजी संस्थेचे सर्व संचालक व ४८ कर्मचारी तसेच इतर संस्थाचे १४ पदाधिकारी व कर्मचारी यांना तज्ञ व्यक्ती मार्फत प्रशिक्षण देण्यात आले आहे. तसेच दि. २० फेब्रुवारी २०११ रोजी संस्थेचे सर्व संचालक, कर्मचारी व दैनंदिन ठेव प्रतिनिधी यांचेसाठी ठाणे जिल्हा सहकारी बोर्डाच्या माध्यमातुन एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली.

## आभार :-

सहकार क्षेत्रास उत्तम वळण लागावे, सहकार चळवळ बळकट व्हावी यासाठी प्रयत्नशील असलेले महाराष्ट्र राज्याचे मा. सहकार आयुक्त व विशेष निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे, मा. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, कोकण विभाग, मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था ठाणे, मा. उपनिबंधक सहकारी संस्था पुणे, मा. उपनिबंधक सहकारी संस्था, ठाणे तालुका, ठाणे तसेच संस्था कार्यक्षेत्रातील सहकारी खात्याचे विविध पदाधिकारी त्याचेही संस्था ऋणी आहे.

संस्थेच्या कार्यक्षेत्रातील ठाणे जिल्हा सहकारी बोर्ड कल्याण, महाराष्ट्र राज्य सह. बँक, ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक लि., कॉसमॉस को-ऑप. बँक, अभ्युदय को-ऑप. बँक, सारस्वत को-ऑप. बँक, महानगर को-ऑप. बँक, अपना सहकारी बँक, कुर्ला नागरिक सह. बँक, नवी मुंबई को-ऑप. बँक, नॅशनल को-ऑप. बँक, सातारा सह. बँक, राजर्षी शाहु सहकारी बँक लि. यांचे शाखाधिकारी व कर्मचारी यांची संस्था आभारी आहे.

संस्थेचे २०१०-२०११ या आर्थिक वर्षाचे वैधानीक लेखापरिक्षक श्री. व्ही. जी. शिंदे, चार्टर्ड अकौंटंट व अंतर्गत लेखापरिक्षक श्री. बी. आर. सावंत, चार्टर्ड अकौंटंट, संगणकासाठी मे. कॉमविझार्ड सिस्टम्स, तसेच संस्थेचे कायदेविषयक सल्लागार यांनी संस्थेला आस्थेने मार्गदर्शन केल्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

संस्थेच्या प्रगतीसाठी अहोरात्र झटणारे संस्थेचे कर्मचारी, दै. ठेव प्रतिनिधी, सभासद व ठेवीदार आणि हितचिंतकांनी दिलेले सहकार्य व प्रोत्साहन यामुळेच संचालक मंडळ यशस्वी वाटचाल करु शकले त्याबद्दल आपणा सर्वांचे पुन्हा मनःपुर्वक आभार मानुन आपल्या लोभाची व सहकार्याची वृद्धी व्हावी अशी प्रार्थना करतो.

## श्रद्धांजली :-

अहवाल सालामध्ये भारतातील जे थोर नेते, संशोधक, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, साहित्यिक, पत्रकार, सैनिक, कलावंत, शिक्षणतज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, सहकार तज्ञ, आपल्या संस्थेचे मान्यवर सभासद, ठेवीदार व हितचिंतक दिवंगत झालेले आहेत त्यांना ही सभा नम्रतापूर्वक अभिवादन करुन त्या सर्वांच्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**

आपला सहकारी

**कृष्णा धुमाळ**

अध्यक्ष



दि. ३१ मार्च २०११

| सन २००९-१० रु. पैसे | भांडवल व देणी | | सन २०१०-११ रु. पैसे |
|---|---|---|---|
| ५,००,००,०००.०० | **अधिकृत भाग भांडवल :** | | ५,००,००,०००.०० |
| १,३५,७९,९००.०० | **वसूल भाग भांडवल :** | | १,५७,८८,८००.०० |
| | **राखीव निधी व इतर निधी :** | | |
| ४३,३९,०४५.०० | राखीव निधी | ४८,८३,८४९.०० | |
| ७६,८८,२०१.०० | इमारत निधी | ९०,११,६५१.०० | |
| २२,६०,०००.०० | संशयित बुडीत कर्ज निधी | २६,६०,०००.०० | |
| १,८५,०००.०० | लाभांश समानिकरण निधी | १,८५,०००.०० | |
| ४६,७२४.०० | सभासद कल्याण निधी | ४८,४१८.०० | |
| ५३,९९९.०० | धर्मादाय निधी | ५३,९९९.०० | |
| ४३,०००.०० | सेवक कल्याण निधी | ५३,०००.०० | |
| २०,०००.०० | सहकार प्रशिक्षण निधी | ८०,२४४.०० | |
| ९२,०००.०० | आकस्मिक निधी | ९२,०००.०० | |
| ०.०० | गुंतवणुक चढउतार निधी | १,६५,०००.०० | |
| ०.०० | रौप्य महोत्सव निधी | २०,०००.०० | |
| ०.०० | उत्पादित कर्जावरील संभाव्य तरतुद | ६,३०,०००.०० | १,७८,८३,१६१.०० |
| | **सभासद ठेवी :** | | |
| २,५८,२३,६०९.०० | बचत ठेव | २,९८,७६,१५९.९६ | |
| ६,२८,९०,१३५.०० | दैनंदिन बचत ठेव | ७,५१,६४,९७९.०० | |
| ३०,२०,५३०.०० | सभासद ठेव | ३०,५३,४७१.०० | |
| ४,३६,४१,३९४.०० | अल्प मुदत ठेव | ६,२६,३४,४५३.०० | |
| ४,१३,०६,४००.०० | मुदत ठेव | ५,६६,६३,०५४.०० | |
| १,७४,१८,१३४.०० | दामदुप्पट ठेव | १,९९,३०,६५४.०० | |
| ३४,२९६.०० | पारिजात बक्षीस ठेव-१९९८ | ३४,२९६.०० | |
| १,७६,००३.०० | पारिजात बक्षीस ठेव-२००० | १,७६,००३.०० | |
| ५६,०००.०० | सिद्धी ठेव-२००१ | ४४,०००.०० | |
| ३२,४४,१३७.०० | संकल्प सिद्धी ठेव-२००३ | २०,४६,०१५.०० | |
| २,३२,५२,१२५.०० | मासिक प्राप्ती ठेव | ३,७३,३६,७२५.०० | |
| २५,७६,१११.०० | आवर्त ठेव | २७,०३,४५७.०० | |
| ३,८८,७३,९९३.०० | शुभकार्य ठेव | ४,३७,४४,१२३.०० | |
| १,३५,८६,४२२.०० | धनवृध्दी ठेव | ११,६०,५६२.०० | |
| १,६५,१७,५३८.०० | धन लक्ष्मी ठेव | १,४१,७१,७९०.०० | |
| --- | शुभ लक्ष्मी ठेव | १०,२९,०९१.०० | ३४,९७,६८,८३२.९६ |
| ३२,०७,२४,६९६.०० | पुढील पानावर........ | | ३८,३४,४०,७९३.९६ |

## रोजीचे ताळेबंदपत्रक

| सन २००९-१० रु. पैसे | मालमत्ता व येणी | | सन २०१०-११ रु. पैसे |
|---|---|---|---|
| | **रोख व बँक शिल्लक :** | | |
| १७,८४,९६४.२९ | रोख शिल्लक | २,०३,०७४.८९ | |
| २४,६६,९४०.२८ | कॉसमॉस को-ऑप. बँक लि. | २२,८९,१७७.४१ | |
| २३,९७८.७० | महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. | १९,२५५.११ | |
| २८,६७९.०० | दि. ठाणे जि.म.सह.बँक | ३३,३७९.०० | |
| ७,१०,०८९.५३ | नवी मुंबई को-ऑप.बँक | ५,९६,७४५.५३ | |
| २२,१८,९९२.५० | अभ्युदय को-.ऑप.बँक | ४३,००,२६५.९६ | |
| १४,१३,७११.४५ | नॅशनल को-ऑप.बँक | ५,८१,००७.४५ | |
| १,३३,७९७.०० | राजश्री शाहू सह. बँक लि.-पुणे | १,९०,९५८.०० | |
| १,२१,९६२.४९ | ॲक्सीस बँक लि. | १,०२,९१६.५८ | |
| १,६४,२८४.८३ | सातारा सहकारी बँक लि. | २४,६५०.३८ | |
| २,७४,०८५.०० | महानगर को-ऑप.बँक लि. | १,८०,४९५.०० | |
| ७७५.७० | सारस्वत को-ऑप.बँक लि. | ०.०० | |
| ५,०४५.०० | अजित सहकारी बँक लि. | ०.०० | ८५,२१,९२५.३१ |
| | **गुंतवणूक :** | | |
| १,०००.०० | ठाणे जि.मध्य.सह.बँक-भाग | १,०००.०० | |
| ३,०००.०० | महा.रा.सह.पत.फेडरेशन-भाग | ३,०००.०० | |
| ३९,१२,५३०.०० | ठाणे जि.म.सह.बँक-राखीव व इतर निधी | ४४,१२,५३०.०० | |
| २६,५५,०००.०० | महाराष्ट्र रा. सह. बँक-राखीव व इतर निधी | ३६,५१,०३७.०० | |
| २५,१६,०००.०० | ठाणे जि.म.बँक-मुदत ठेव | २५,१६,०००.०० | |
| २९,००,०००.०० | महा. रा. सह. बँक लि.-मुदत व आवर्त ठेव | ३१,००,०००.०० | |
| १,०५,००,०००.०० | कॉसमॉस को-ऑप. बँक-मुदत ठेव | १,२९,००,०००.०० | |
| १०,००,०००.०० | सारस्वत को-ऑप बँक लि. -मुदत ठेव | १०,००,०००.०० | |
| १,८१,५०,०००.०० | अभ्युदय को-ऑप बँक-मुदत व आवर्त ठेव | २,७७,५७,५००.०० | |
| १,०३,३८,६९७.०० | नवी मुंबई को.-ऑप बँक-मुदत व आवर्त ठेव | १,२९,०९,७७७.०० | |
| ४६,००,०००.०० | अपना सहकारी बँक लि.-मुदत व आवर्त ठेव | ८८,११,२५०.०० | |
| ९३,००,०००.०० | महा. को-ऑप बँक लि.-मुदत व आवर्त ठेव | १,०२,००,०००.०० | |
| १५,००,०००.०० | कुर्ला नागरिक सह. बँक लि.-मुदत ठेव | १०,००,०००.०० | |
| २०,००,०००.०० | यु.टी.आय. म्युचअल फंड | २०,००,०००.०० | |
| १०,००,०००.०० | ग्रेटर बॉम्बे को-ऑप बँक -मुदत ठेव | ०.०० | |
| २४,५०,०००.०० | नॅशनल को-ऑप बँक -मुदत ठेव | ०.०० | ९,०२,६२,०९४.०० |
| | **सभासद कर्जे :** | | |
| ३,३७,२६,५११.०० | वैयक्तिक /जामिनकी कर्ज | २,६२,२६,२१८.०० | |
| ५१,००९.०० | व्यवसाय कर्ज | ३,५०५.०० | |
| ६३,१२,८३०.०० | वाहन तारण कर्ज | ६८,९७,२५६.०० | |
| १३,०४,७६,१११.०० | सुरक्षित तारण कर्ज | १८,७१,३६,९३३.०० | |
| ७६,६०,७४४.०० | इतर तारण कर्ज | ४२,५१,३१८.०० | |
| २६,०४,००,७५३.७७ | पुढील पानावर........ | | ९,८७,८४,०१९.३१ |

दि. ३१ मार्च २०११

| सन २००९-१० रु. पैसे | भांडवल व देणी | | सन २०१०-११ रु. पैसे |
|---|---|---|---|
| ३२,०७,२४,६९६.०० | **मागील पानवरुन........** | | ३८,३४,४०,७९३.९६ |
| | **इतर देणी :** | | |
| १२,१५,५८८.०० | ठेवीवरील देय व्याज | १४,२५,७९६.०० | |
| ७,८०,३६५.०० | लाभांश देणे | ९,१८,०१६.०० | |
| ५०,०००.०० | सिक्युरिटी डिपॉझीट | ५०,०००.०० | |
| ५५,७२४.०० | अधिभार (सरचार्ज) देणे | ५२,०३०.०० | |
| ०.०० | शेअर्स अनामत खाते | ४४०.०० | २४,४६,२८२.०० |
| | **तरतूदी :** | | |
| ६,६२५.०० | व्यवसाय कर | ८,४७५.०० | |
| ४७,९३५.०० | आयकर टि.डी.एस. | ५५,५३६.०० | |
| ५८,०१४.०० | सेवक भविष्य निर्वाह निधी | ६४,०५५.०० | |
| २,२१,०००.०० | लेखापरिक्षण फी | २,७५,०००.०० | |
| ५,०००.०० | शिक्षण निधी | ५,०००.०० | |
| ६,४६७.०० | कर्मचारी विमा हप्ता | ६,२१२.०० | |
| १३,९००.०० | टेलिफोन बिल | १२,०२५.०० | |
| २६,०००.०० | विज बिल | २०,१५०.०० | |
| ५,०००.०० | व्यवसायिक फी | ६,०००.०० | |
| ५,१०४.०० | इतर देणी | २६,०६९.०० | ४,७८,५२२.०० |
| २०,५०,०००.०० | **थकीत व्याज निधी तरतूद :** | | २६,००,०००.०० |
| | **नफा तोटा खाते :** | | |
| ४०३.६० | मागील वर्षाचा शिल्लक नफा | ८०५.२७ | |
| १२,६२,८३६.६७ | अधिक : चालू वर्षाचा नफा | ३१,८५,३०९.५८ | ३१,८६,११४.८५ |
| ३२,६५,३४,६५८.२७ | **एकुण** | | ३९,२१,५१,७१२.८१ |

| मे. व्ही. जे. शिंदे अॅन्ड कं. | मे. बी. आर. सावंत अॅन्ड कं. | श्री. विजय बं. मोरे |
|---|---|---|
| चार्टर्ड अकैंटंट | चार्टर्ड अकैंटंट | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| वैधानिक लेखा परिक्षक | अंतर्गत लेखा परिक्षक | |

## रोजीचे ताळेबंदपत्रक

| सन २००९-१० रु. पैसे | मालमत्ता व येणी | | सन २०१०-११ रु. पैसे |
|---|---|---|---|
| २६,०४,००,७५३.७७ | **मागील पानवरुन.........** | | ९,८७,८४,०१९.३१ |
| १६,४२,३४९.०० | शासकीय रोखे कर्ज | १५,६७,०३२.०० | |
| २०,२८,६०६.०० | दावा दाखल कर्ज | ७७,०६,४१४.०० | |
| ११,६३,१७२.०० | कर्मचारी वैयक्तिक कर्ज | १४,८५,७७९.०० | |
| २,३५,९९३.०० | कर्मचारी वाहन तारण कर्ज | १,७०,३६०.०० | |
| २५,९०,३११.०० | कर्मचारी घरतारण कर्ज | २४,४०,९३५.०० | |
| १५,३०,६८४.०० | दैनंदिन ठेव प्रतिनिधी कर्ज | १९,१८,०९५.०० | |
| २,७५,३०,९२२.०० | ठेव तारण कर्ज | २,२९,९१,८९०.०० | |
| १२,७२,४१७.०० | सोने तारण कर्ज | ३,३८,६४३.०० | २६,३१,३४,३७८.०० |
| | **मालमत्ता :** | | |
| ४९,२८,९९२.०० | फर्निचर व फिक्चर्स खाते | ४५,६१,२४३.०० | |
| ११,१८,१८९.०० | संगणक खाते | ९,६४,२८७.०० | |
| २,६७,१५७.०० | वातानुकूलीत यंत्रे खाते | २,००,३६७.०० | |
| ३,८२,३०४.०० | इलेक्ट्रोक साधन सामुग्री खाते | ३,६५,८२७.०० | |
| २,३६,७१५.०० | कार्यालय साधन सामुग्री खाते | २,७३,६९४.०० | |
| ५६,४०९.०० | इनव्हर्टर खाते | ७४,२१७.०० | |
| १,११,४६,२३४.०० | इमारत खाते | १,०७,८८,९२२.०० | |
| ३६,९५४.०० | डेली कलेक्शन मशीन खाते | ४८,०७३.०० | |
| १,३३०.०० | ग्रंथालय खाते | ९,२३९.०० | |
| १४,७३१.०० | मोबाईल फोन खाते | १०,३१२.०० | १,७२,९६,१८१.०० |
| | **येणे व्याज :** | | |
| २४,८२,४७७.०० | सभासद कर्जावरील येणे व्याज | २५,८७,३६८.०० | |
| ६०,५०,५४८.०० | गुंतवणूकीवरील येणे व्याज | ८८,४२,८५७.०० | १,१४,३०,२२५.०० |
| | **इतर येणी :** | | |
| ७,३०,०००.०० | कार्यालय अनामत | ७,८०,०००.०० | |
| १०,५५०.०० | दुरध्वनी सुरक्षा ठेव | १३,५५०.०० | |
| ४२,२६०.०० | वीज सुरक्षा ठेव | ४२,२६०.०० | |
| ३,५००.०० | पाणी कनेक्शन सुरक्षा ठेव | ३,५००.०० | |
| ५,०००.०० | बि.ई.एस.टी. सुरक्षा ठेव | ५,०००.०० | |
| २,४७,२७४.५० | स्टेशनरी स्टॉक | ३,५३,४८०.५० | |
| १४,७००.०० | मुद्रांक साठा | १६,७५०.०० | |
| ३७,६८३.०० | आगाउ विमा | ४६,७६७.०० | |
| ८,९२५.०० | टि.डी.एस. व इतर येणे खाते | १२,७४९.०० | |
| १,७८,३२२.०० | प्राथमीक खर्च (शाखा उद्घाटन) | ९९,३१८.०० | |
| ९९,७५१.०० | आगाऊ खर्च | ०.०० | |
| ९,३४५.०० | पॅनकार्ड कुपन्स स्टॉक | ४,७८५.०० | |
| ०.०० | आयकर (२०१०-२०११) | २५,०००.०० | १४,०३,१५९.५० |
| | **ॲडव्हान्स :** | | |
| ३०,१००.०० | दै. ठेव प्रतिनिधी मशीन ॲडव्हान्स | | १,०३,७५०.०० |
| ३२,६५,३४,६५८.२७ | एकुण | | ३९,२१,५१,७१२.८१ |

| श्री. दिपक शं. टेळे | श्री. बाळासाहेब वि. ताकवले | श्री. कृष्णा पां. धुमाळ |
|---|---|---|
| खजिनदार | सचिव | अध्यक्ष |

दि. ३१ मार्च २०११

| सन २००९-१० रु. पैसे | खर्च | सन २०१०-११ रु. पैसे |
|---|---|---|
| १,८५,४७,१६५.०० | सभासद ठेवीवरील व्याज | २,२०,९८,४९३.०० |
| ३,५८,०९३.०० | अधिकर्ष व्याज खर्च | ३९,५८०.०० |
| ४५,२३,५७२.०० | कर्मचारी पगार, बोनस व भत्ते | ५०,१२,४७७.०० |
| ३,५७,८३२.०० | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संस्था अंशदान | ४,३०,७३३.०० |
| ५१,३२,४११.०० | दैनंदिन ठेव प्रतिनिधी कमिशन | ६१,८३,९४७.०० |
| ६,९६,०८६.०० | कार्यालय भाडे | ७,०७,२९२.०० |
| २,१४,३०१.५४ | छपाई व स्टेशनरी खर्च | २,२३,२९०.५० |
| ३९,९३६.०० | वार्षिक अहवाल खर्च | ४६,२००.०० |
| १,६३,३०७.०० | किरकोळ खर्च | १,५८,१६८.०० |
| ४,३०,३४६.०० | विज खर्च | ४,०७,२१९.०० |
| १,६९,०७४.०० | टेलिफोन खर्च | १,८१,६५९.०० |
| १,०३,३१८.०० | प्रवास खर्च | १,२४,७८७.०० |
| ६२,०३२.०० | विमा खर्च | ६३,४८६.०० |
| २३,६६८.०० | तार व टपाल खर्च | १४,६००.०० |
| ४,११,२९९.५० | कार्यालय दुरूस्ती व देखभाल खर्च | २,१२,४७८.०० |
| १०,४३६.०० | कार्यालय पाणी बिल खर्च | ७,२२९.०० |
| १,०४,५६०.०० | दिनदर्शिका छपाई खर्च | ४४,५००.०० |
| ९५२.०० | संगणक दुरूस्ती व देखभाल खर्च | १२,४९१.०० |
| २,५१,८९७.०० | संगणक दुरूस्ती व देखभाल (AMC) | २,६४,६००.०० |
| ९,५७५.०० | वातानुकूलीत यंत्रे (AMC) | १८,१४५.०० |
| २५,६००.०० | कार्यालय साफसफाई (AMC) | १३,०५०.०० |
| १६,०८४.०० | डेली मशिन (AMC) | २२,४००.०० |
| २३,६४०.०० | कार्यालय मालमत्ता कर खर्च | ५१,६०९.०० |
| १,५८४.०० | कार्यालय देखभाल शुल्क | ०.०० |
| ७०,४३२.०० | कार्यालय साफसफाई खर्च | ६९,७४७.५० |
| २,४२,२०८.०० | लेखापरिक्षण फी (शासकीय/अंतर्गत) | ३,०६,७०२.०० |
| २९,४३६.०० | कायदे विषयक सल्लागार फी | ५३,०६८.०० |
| २,५००.०० | व्यवसाय कर खर्च संस्था | २,५००.०० |
| १,०००.०० | सभासदत्व व वर्गणी | ०.०० |
| २५,२००.०० | कर्मचारी प्रशिक्षण खर्च | १०,९५५.०० |
| ३४,७८५.०० | दिपावली भेट खर्च | १८,१७१.०० |
| ५७,८६८.७७ | पुजा खर्च | ७८,११८.०० |
| ३,२१,४०,१९८.८१ | पुढील पानावर....... | ३,६८,७७,६९५.०० |

## अखेरचे नफा-तोटा पत्रक

| सन २००९-१० रु. पैसे | उत्पन्न | सन २०१०-११ रु. पैसे |
|---|---|---|
| ३,०६,९६,९०३.०० | सभासद कर्जावरील व्याज | ३,५१,४१,८०३.०० |
| ५३,१३,०९८.२० | गुंतवणूकीवरील व्याज | ६९,५८,१०२.६० |
| ५,४८,५४४.०० | कर्ज प्रोसेसिंग चार्जेस | ८,०३,००१.०० |
| २,८८,४६६.०० | कर्ज वसुली चार्जेस जमा | २,८१,५९४.०० |
| २,४१,७४०.३४ | फॉर्म फी, स्टेशनरी चार्जेस इ. | ३२,४९०.०० |
| १५०.०० | लाभांश | १५०.०० |
| १,५५,०००.०० | इतर जमा | ५,९२,६२२.९१ |
| ३,७२,४३,९०१.५४ | पुढील पानावर....... | ४,३८,०९,७६३.५१ |

दि. ३१ मार्च २०११

| सन २००९-१० रु. पैसे | खर्च | सन २०१०-११ रु. पैसे |
|---|---|---|
| ३,२१,४०,१९८.८१ | मागील पानवरुन........ | ३,६८,७७,६९५.०० |
| ३५,३५२.०६ | बँक चार्जेस खर्च | ३२,१८२.९३ |
| ८,२४४.०० | सर्विस टॅक्स | ८,६६१.०० |
| २०,२८५.०० | कर व परवाना फी | ८,९००.०० |
| १७,६९०.०० | अतिरिक्त लाभ कर | ०.०० |
| ४५,७७७.०० | वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च | ५५,६३०.०० |
| ९४,७७९.०० | प्राथमिक खर्च निर्लेखित | ७९,००४.०० |
| ६२,२५०.०० | संचालक सभा भत्ता खर्च | ६८,७००.०० |
| १,५००.०० | सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट चार्जेस | २,०००.०० |
| ८,६८७.०० | फेस्टिवल सेलिब्रेशन खर्च | ०.०० |
| ६७,३५५.०० | भेट व तपासणी खर्च | ८२,९९६.०० |
| १,२०३.०० | लॉकर भाडे | २,९०३.०० |
| १,२२,११६.०० | कर्ज वसुली खर्च | १,८९,८६४.०० |
| २५,०३९.०० | जाहिरात खर्च | १४,२०३.०० |
| ८१,५३१.०० | सिक्युरिटी गार्ड खर्च | १,०६,७४६.०० |
| ०.०० | उत्पादित कर्ज संभाव्य तरतूद | ६,३०,०००.०० |
| ४३,८२२.०० | कर्मचारी ग्रुप ग्रज्युईटी (एल.आय.सी.) खर्च | १,४६,५१३.०० |
| ५,०००.०० | शिक्षण निधी तरतूद | ५,०००.०० |
| ९,५०,०००.०० | थकित व्याज निधी तरतूद | ४,१०,०००.०० |
| ६,७०,०००.०० | संशयित व बुडित कर्ज निधी तरतुद | २,५०,०००.०० |
| ०.०० | गुंतवणूक चढउतार निधी | १,६५,०००.०० |
| ०.०० | सहकार प्रशिक्षण निधी तरतुद | ८०,०००.०० |
| १५,८०,२३६.०० | घसारा | १४,०८,४५६.०० |
| १२,६२,८३६.६७ | निव्वळ नफा ताळेबंदास वर्ग | ३१,८५,३०९.५८ |
| ३,७२,४३,९०१.५४ | एकुण | ४,३८,०९,७६३.५१ |

**मे. व्ही. जे. शिंदे ॲन्ड कं.**
चार्टर्ड अकैंटंट
वैधानिक लेखा परिक्षक

**मे. बी. आर. सावंत ॲन्ड कं.**
चार्टर्ड अकैंटंट
अंतर्गत लेखा परिक्षक

**श्री. विजय बं. मोरे**
मुख्य कार्यकारी अधिकारी

## अखेरचे नफा-तोटा पत्रक

| सन २००९-१० रु. पैसे | उत्पन्न | सन २०१०-११ रु. पैसे |
|---|---|---|
| ३,७२,४३,९०१.५४ | मागील पानवरुन........ | ४,३८,०९,७६३.५१ |
| ३,७२,४३,९०१.५४ | एकुण | ४,३८,०९,७६३.५१ |

| श्री. दिपक शं. टेळे | श्री. बाळासाहेब वि. ताकवले | श्री. कृष्णा पां. धुमाळ |
|---|---|---|
| खजिनदार | सचिव | अध्यक्ष |

## वैधानिक लेखापरिक्षकांचा अहवाल :-

(महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा कलम ८१ (५-ब) आणि महाराष्ट्र सहकारी संस्थांचा नियम ६९ अन्वये दयावयाचा)

आम्ही पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. नवी मुंबई या संस्थेच्या दिनांक ३१ मार्च २०११ रोजीचे ताळेबंद व त्याच दिवशी संपलेल्या नफा तोटा पत्रकाचे वैधानिक लेखा परिक्षण करुन सोबत जोडलेली आहेत. हि हिशोबी पत्रके तयार करण्याची जबाबदारी संस्थेच्या व्यवस्थापनाची आहे. या अर्थिक पत्रकाचे लेखा परिक्षण करुन त्यावर मत प्रदर्शित करण्याची आमची जबाबदारी आहे.

साधारणतः भारतामध्ये स्विकृत झालेल्या लेखा परिक्षण मान्यतानुसार आम्ही संस्थेचे लेखापरिक्षण केलेले आहे. या लेखापरिक्षण मान्यतानुसार आम्ही लेखापरिक्षण कार्यक्रम आखून व त्याप्रमाणे काम करुन विश्वासापूर्वक असे पाहिले आहे की, सदर आर्थिक पत्रकांत कोणतेही महत्वाचे दोष राहू नयेत. लेखापरिक्षणात चाचणी तपासणी तसेच आर्थिक पत्रकांतील रक्कमांच्या संदर्भात कागदपत्रे तपासून या रक्कमां पत्रकात योग्यरित्या दाखविलेल्या असल्याबद्दलची खात्री करणे. त्याचप्रमाणे मान्यता प्राप्त लेखांकन सिध्दांताप्रमाणे आर्थिक पत्रकांचे मुल्यांकन अनुमान आणि तसेच हि आर्थिक पत्रके संस्थेच्या व्यवस्थापनाने महत्त्वपूर्ण अनुमानाप्रमाणे प्रस्तुत केल्याबद्दलचे मुल्यांकन या लेखापरिक्षणात समाविष्ट आहे. त्यामुळे आम्ही केलेल्या लेखापरिक्षणाप्रमाणे वाजवीरित्या मत प्रदर्शित करण्याबद्दल आम्हाला खात्री आहे. त्याचप्रमाणे आम्ही अभिप्राय देतो की :-

१) आमच्या लेखापरिक्षणाच्या संदर्भात, आमच्या ज्ञानाप्रमाणे आणि विश्वासाप्रमाणे, आम्ही संस्थेकडुन मागितलेली सर्व माहिती व स्पष्टीकरणे आम्हाला समाधानकारक वाटली.

२) संस्थेच्या ताळेबंद आणि नफा तोटा पत्रके हि महाराष्ट्र सहकारी सोसायटयांच्या कायदा व त्या खालील नियमांनुसार तयार केलेली आहेत.

३) संस्थेची ताळेबंद पत्रके आणि नफा तोटा पत्रके हि संस्थेच्या हिशोबी पुस्तके व विवरणे या बरोबर मिळती जुळती आहेत.

४) आमच्या मते मला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार त्याचप्रमाणे या अर्थिक पत्रकावर दिलेल्या स्वतंत्र टिपणीनुसार आणि अलहिदा दिलेल्या शेऱ्यास पात्र राहून तसेच भारतामध्ये साधारणतः स्विकृत असलेल्या लेखापरिक्षण मान्यतानुसार.

अ) ताळेबंद पत्रक सोसायटीची दि. ३१ मार्च २०११ ची खरी व योग्य स्थिती दर्शविते आणि

ब) नफा तोटा पत्रक दि. ३१ मार्च २०११ रोजी संपलेल्या वर्षाचा खरा व योग्य नफा दर्शविते.

५) सन २०१०-२०११ सालाकरिता संस्थेस लेखापरीक्षण वर्ग **"अ"** देण्यात आला आहे.

६) वरील दाखला प्रसारित करण्यात येणाऱ्या लेखापरिक्षण प्रतिवृत्तांवरील विभाग 'अ' 'ब' 'क' मधील शेऱ्यास पात्र राहून देण्यात येत आहे.

**व्ही. जी. शिंदे आणि कं.**
**चार्टर्ड अकौटंट**
सही
व्ही.जी. शिंदे
प्रोप्रायटर

स्थळ : नवी मुंबई

दिनांक : ०५/०७/२०११

## अंदाज पत्रक सन २०११-२०१२

(रू. लाखात)

| उत्पन्न तपशिल | अंदाजे उत्पन्न २०१०-११ | प्रत्यक्ष उत्पन्न २०१०-११ | अंदाजे उत्पन्न २०११-१२ |
|---|---|---|---|
| कर्जावरील व्याज | ३६०.०० | ३५१.४२ | ४१६.५५ |
| गुंतवणुकीवरील व्याज | ७०.०० | ६९.५८ | ९२.२० |
| इतर उत्पन्न | १३.०० | १७.१० | २०.४० |
| **एकूण रू.** | **४४३.००** | **४३८.१०** | **५२९.१५** |

| खर्च तपशिल | अंदाजे खर्च २०१०-११ | प्रत्यक्ष खर्च २०१०-११ | अंदाजे खर्च २०११-१२ |
|---|---|---|---|
| सभासद ठेवीवरील व्याज | २३२.०० | २२०.९८ | २६२.९६ |
| कर्मचारी पगार, बोनस, भ.निर्वाह निधी व ग्रॅज्युईटी खर्च | ५९.७० | ५५.९० | ७१.०८ |
| दैनंदिन ठेव प्रतिनिधी कमिशन * | ५९.०० | ६१.८४ | ८५.०० |
| छपाई व स्टेशनरी, अहवाल व कॅलेंडर छपाई खर्च | ५.५० | ३.१४ | ५.५० |
| वार्षिक सभा व संचालक भत्ता खर्च | १.४५ | १.२५ | १.७५ |
| प्रवास व व्हिजीट खर्च, किरकोळ, दिवाळी भेट गणवेश खर्च | ६.०५ | ३.८४ | ५.९५ |
| विमा व पोस्टेज खर्च | १.१५ | ०.७९ | १.०५ |
| विज, फोन, पाणी, कार्यालय भाडे, सर्विस टॅक्स, लायसन्स फी, मालमत्ता कर व मेंटेन्स चार्जेस | १५.९५ | १३.७३ | १५.६५ |
| देखभाल व दुरुस्ती, उद्घाटन, पुजा खर्च, सर्व्हिस चार्ज, साफसफाई खर्च व सिक्युरिटी गार्ड खर्च | ५.७५ | ५.४५ | ७.२५ |
| ऑडिट फी खर्च * | ३.०० | ३.०७ | ३.२५ |
| AMC वर्गणी, व्यवसाय कर, कायदेविषयक सल्लागार फी | ४.५५ | ३.७४ | ४.२८ |
| ओव्हर ड्राफ्ट कर्ज व्याज, बँक चार्जेस व लॉकर भाडे | ५.७३ | ०.७५ | ४.६५ |
| कर्ज वसुली व जाहिरात खर्च | ३.०० | २.०४ | २.५० |
| घसारा खर्च | १६.०० | १४.०८ | १४.५० |
| तरतुदी (शिक्षण निधी, बुडीत कर्ज निधी, थकित व्याज निधी, उत्पादक मालमत्ता, प्रशिक्षण, गुंतवणूक निधी) * | ८.०० | १५.४० | ९.०० |
| अन्य खर्च (सॉफ्टवेअर डेव्ह, संगणक दुरुस्ती व प्रशिक्षण खर्च) | ०.५० | ०.२५ | ०.५० |
| नफा | १५.६७ | ३१.८५ | ३४.२८ |
| **एकूण रू.** | **४४३.००** | **४३८.१०** | **५२९.१५** |

* अंदाजापेक्षा अधिक झालेल्या खर्चास संचालक मंडळाने मंजुरी दिली असुन वा.स.सा.सभेच्या मंजुरीसाठी शिफारस करीत आहोत.

## संचालक कर्जाचा तपशील :-

| ३१-०३-२०११अखेर येणे कर्ज | ३१-०३-२०११ अखेर थकबाकी | थकबाकीचे प्रमाण |
|---|---|---|
| २७,६८,८०७.०० | ००.०० | ००% |

## संचालक नातेवाईक कर्जाचा तपशील :-

| ३१-०३-२०११ अखेर येणे कर्ज | ३१-०३-२०११ अखेर थकबाकी | थकबाकीचे प्रमाण |
|---|---|---|
| ४१,६३,४९०.०० | ००.०० | ००% |

## संस्थेची गत पाच वर्षातील आर्थिक प्रगती

| सन | २००६-२००७ | २००७-२००८ | २००८-२००९ | २००९-२०१० | २०१०-२०११ |
|---|---|---|---|---|---|
| भाग भांडवल | ९५,३५,७०० | १,०६,८५,००० | १२११२,४०० | १,३५,७९,९०० | १,५७,८८,८०० |
| गुंतवणूक | ३,३२,५१,८५० | ३,७७,०२,०२८ | ५२०७१,५८० | ७,२८,२६,२२७ | ९०,२६२,०९४ |
| ठेवी | १५,०७,८९,४७९ | १८,६०,३४,९६३ | २४०८१६,१६३ | २९,२४,१६,८२७ | ३४,९७,६८,८३३ |
| कर्जे | ११,८२,००,२८१ | १५,१२,६२,१२९ | १८,२३,७६,४२० | २१,६२,२१,६६७ | २६,३१,३४,३७८ |
| खेळते भाग भांडवल | १७,३२,६६,७६४ | २१,१७,५२,८५५ | २६,९४,७४,६६५ | ३२,६५,३४,६५८ | ३९,२१,५१,७१२ |

## सभासदांना सूचना :-

- ❖ सभासदाने आपला पत्ता बदलल्यास नवीन पत्त्याविषयी कार्यालयास लेखी सूचना त्वरीत करावी.
- ❖ ज्या सभासदांनी आपले वारस नेमले नसतील त्यांनी अपले वारस नेमून घ्यावेत.
- ❖ सर्व सभासदांचे लाभांश व भाग दाखले तयार आहेत ते संबंधीत शाखेतून घेऊन जावेत.
- ❖ कर्ज मागणी करताना सभेपूर्वी ३ दिवस अगोदर कर्ज मागणी अर्ज शाखेत जमा करावेत.
- ❖ पूर्ण भरलेले व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेले अर्ज कर्ज मंजूर सभेत ठेवले जातील.
- ❖ आपण घेतलेल्या कर्जाचे हप्ते वेळेवर भरा व संस्थेस सहकार्य करा.
- ❖ प्रत्येक महिन्याच्या शेवटी आपले कर्ज, दैनंदिन ठेव, आर. डी. या बाबतचे पासबुकावर संस्थेत येऊन अधिकाऱ्यांची सही घ्यावी.
- ❖ संस्थेच्या व सभासदांच्या हिताच्या दृष्टीने आपला सल्ला व मार्गदर्शन लेखी स्वरुपात कळवा.

# परिशिष्ट - 'अ'

| | | |
|---|---|---|
| संस्थेचे नांव | : | **पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.,** नवी मुंबई - ४०० ७०६. |
| मुख्य कार्यालय | : | पारिजात भवन, प्लॉट नं. १८, सेक्टर-१०ए, नेरुळ (प.), नवी मुंबई - ४०० ७०६. |
| नोंदणी क्रमांक | : | टी.एन.ए./टी.एन.ए./आर.एस्.आर. (सी.आर.) ९५१-९७ |
| कार्यक्षेत्र | : | बृहन्मुंबई, ठाणे, रायगड व पुणे जिल्हा |
| शाखा | : | नऊ (प्रशासकीय कार्यालय व्यतिरिक्त नऊ शाखा) |
| सभासद संख्या | : | ५५७१ |
| अधिकृत भाग भांडवल | : | रु. ५,००,००,०००.०० |
| वसुल भाग भांडवल | : | रु. १,५७,८८,८००.०० |
| राखीव व इतर निधी | : | रु. १,७८,८३,१६१.०० |
| ठेवी | : | रु. ३४,९७,६८,८३३.०० |
| कर्जे | : | रु. २६,३१,३४,३७८.०० |
| बाहेरील कर्जे | : | नाही |
| गुंतवणूक | : | रु. ९,०२,६२,०९४.०० |
| नेट एन.पी.ए. | : | ३.९०% |
| सी. डी. रेशो | : | ६९.७८% |
| लेखापरिक्षण वर्ग | : | "अ" |
| अहवाल सालातील नफा | : | रु. ३१,८६,११४.८५ |
| कर्मचारी वर्ग | : | ५३ |
| खेळते भांडवल | : | रु. ३९,२१,५१,७१२.८१ |

# पारिजात

## को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

पॅनकार्ड सुविधा
फक्त रु.९४/-

## खुशखबर

पॅनकार्ड सुविधा
फक्त रु.९४/-

**केंद्र शासनाच्या आयकर विभागाने बंधनकारक केलेले**



# पॅनकार्ड



**आता पारिजात संस्थेमार्फत सर्व नागरीकांस उपलब्ध.**

पतसंस्थेच्या माध्यमातून अशी सेवा देणारी **पारिजात**
पहिली व एकमेव संस्था.

---



# पारिजात

## को-ऑप.क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई

## विद्यार्थी गुण गौरव सोहळा
सन २०१०-११

सभासदांच्या हुशार मुलांचा गुणगौरव वार्षिक सर्व साधारण सभेत केला जाणार आहे. सभासदांना विनंती करण्यात येते की, त्यांनी २०१०-११ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १० वी आणि १२ वी परीक्षेत कमीत कमी ७० गुण असलेल्या मुलांचे अर्ज दिनांक २४/७/२०११ पर्यंत संस्थेच्या कार्यालयात त्वरीत पाठवावे. अधिक माहितीसाठी कार्यालयात संपर्क साधावा.

## विविध ठेव योजना :-

### 'नातवा' पासून 'आजोबा' पर्यंत..... कुटुंबातील सर्वांसाठी

#### व्याजदर (दि. १/८/२०११ पासून)

| | |
|---|---|
| ३० ते ४५ दिवस | ६.००% |
| ४६ ते ९० दिवस | ७.००% |
| ९१ ते १८० दिवस | ८.००% |
| १८१ ते ३६४ दिवस | ९.००% |
| १ वर्ष ते २ वर्षापेक्षाकमी | १०.००% |
| २ वर्ष ते ३ वर्षापेक्षाकमी | १०.२५% |
| ३ वर्ष ते ४ वर्षापेक्षाकमी | १०.५०% * |
| ४ वर्ष ते ५ वर्षापेक्षाकमी | ११.००% |
| ५ वर्ष व अधिक | १०.००% |

* जेष्ठ नागरिकांना ½% अधिक व्याज

#### मासिक प्राप्ती योजना

खास पेन्शनर व VRS घेतलेल्यांसाठी रु.१,०९,१००/- गुंतवा व दरमहा रु.१०००/- पेन्शन रुपये व्याज मिळवा.

#### शुभकार्य ठेव योजना

| दरमहा | भरा | मिळवा |
|---|---|---|
| रु. ६००/- | फक्त ६६ महिने | रु. ५०,०००/- |
| रु. १२००/- | | रु. १,००,०००/- |

#### लखपती मुदत ठेव योजना

| | | |
|---|---|---|
| रु. ६२,१००/- | ५ वर्षात | रु. १ लाख |
| रु. ५८,२५०/- | ६८ महिन्यात | रु. १ लाख |

#### शुभलक्ष्मी ठेव योजना

| मासिक ठेव रक्कम | ३६ महिन्यानंतर मिळाणारी रक्कम |
|---|---|
| रु. ५,०००/- | रु. २.०० लाख |
| रु. २,५००/- | रु. १.०० लाख |
| रु. १,२५०/- | रु. ५० हजार |

**दामदुप्पट ठेव योजना :- आपली रक्कम ८४ महिन्यात दामदुप्पट**

पारिजात चा सुगंध सदैव मोहक असतो पारिजात मधील ठेव सदैव सुरक्षित असते.

## विविध कर्ज योजना :-

### स्वप्न तुमचे .... सहाय्य आमचे

- गृहपयोगी उपकरणे • फर्निचर • संगणक • शिक्षण • वाहन • मशिनरी
- घरदुरुस्ती • लग्नकार्य • वैद्यकीय • धार्मिक कार्य • व्यवसाय वृद्धी

#### विविध कर्ज योजना

| वैयक्तीक कर्ज | वाहन तारण कर्ज | तारण कर्ज | तत्काळ कर्ज |
|---|---|---|---|
| रु. ७५.०००/- व्याजदर १७% | रु. १०.०० लाख व्याजदर १५% | रु. २५.०० लाख पर्यंत व्याजदर १५% | ठेव तारण LIC/NSC सोने तारण |

# पारिजात

## को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

**ठेवीसाठी फायदयाची । कर्जासाठी सोयीची ।।**
**पारिजात आपल्या सर्वांची ।**
**घेऊन आली एक सुवर्णसंधी "धनवर्षाची" ।।**

आपल्या अमुल्य ठेवींवर आकर्षक व्याज मिळवून देणारी आमची विशेष ठेव योजना सादर करीत आहे.

**संस्थेच्या १५ व्या वर्षात ३७ महिन्यांची विशेष ठेव योजना**

## धनवर्षा ठेव योजना

| ठेव रक्कम | मुदतपुर्ती नंतर ( ३७ महिने) मिळणारी रक्कम |
|---|---|
| १०,०००.०० | १४,०००.०० |
| २०,०००.०० | २८,०००.०० |
| ४०,०००.०० | ५६,०००.०० |
| ५०,०००.०० | ७०,०००.०० |
| १,००,०००.०० | १,४०,०००.०० |
| १,५०,०००.०० | २,१०,०००.०० |
| २,००,०००.०० | २,८०,०००.०० |

**योजना फक्त १ ऑगस्ट २०११ ते ३१ ऑक्टोबर २०११ या कालावधीसाठी**

-: योजनेच्या अधिक माहितीसाठी नजीकच्या शाखेत संपर्क करा :-

### मुंबई विभाग

वाशी - ३२०८६६६४
नेरुळ - ३२५१६९८५
कोपरखैरणे - ३२४८६८०६
दादर - ३२०८६६६५
नवीन पनवेल - ३२६७४६५८

### पुणे विभाग

धनकवडी - ३२९०६७४६
हडपसर - ३२५१७६७१
सिंहगड रोड - ३२५३११०२
चंदननगर - ३२३११७२२




उत्कृष्ट शाखा पुरस्कार स्विकारताना
वाशी शाखेचे कर्मचारी वृंद.

म. रा. सह. संघ मर्या. पुणे अंतर्गत ठाणे जिल्हा
सह. बोर्ड आयोजीत संचालक व कर्मचारी शिबीर.







संस्थेने आयोजीत केलेल्या विद्यार्थी गुणगौरव कार्यक्रमात
गुणवंत विद्यार्थीनीस स्मृती चिन्ह व पारितोषिक मा.खजिनदार
श्री. अनंत प्रभाळे यांचे हस्ते देण्यात आले.

संस्थेचे सर्वोत्कृष्ट दैनंदिन ठेव प्रतिनिधी
श्री. दत्तात्रय श्रीपती साळेकर पुरस्कार स्विकारताना.



# आपल्या सेवेत कार्यरत आमच्या शाखा

## मुंबई विभाग

**वाशी**
अे-३/७, सेक्टर-१५, मराठा भवन मार्ग, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३.
फोन : २७८०२६५९ / ३२०८६६६४

**नेरुळ**
साईप्रसाद शॉपिंग कॉम्प्लेक्स, शॉप नं. २८, प्लॉट नं. १७, सेक्टर - ८, नेरुळ,
नवी मुंबई - ४०० ७०६. फोन : ३२५९६९८५

**दादर**
मगनलाल बी-बिल्डींग, रुम नं. १६, पहिला मजला, कबुतरखान्याजवळ,
स्टेशन रोड, दादर (प.), मुंबई - ४०० ०२८. फोन : ३२०८६६६५

**कोपरखैरणे**
के.पी. हेरिटेज को-ऑप. हौ. सो., शॉप नं. १०, प्लॉट नं. ४१, सेक्टर ७, पोस्ट
ऑफीस समोर, कोपरखैरणे, नवी मुंबई -४०० ७०९. फोन : ३२४८६८०६

**न्यू पनवेल**
ओमश्री निकेतन को-ऑप. हौ. सो., शॉप नं. ८, प्लॉट नं. १२ ए, सेक्टर १,
महात्मा शाळेसमोर, खांदा कॉलनी, न्यु पनवेल-४१०२०६. फोन : ३२६७४६५८

## पुणे विभाग

**धनकवडी**
सरस्वती मंगल कार्यालय, पहिला मजला, सर्व्हे नं. २९/१, पुणे - सातारा रोड,
धनकवडी, पुणे - ४११ ०४३. फोन : ०२०-३२९०६७४६

**हडपसर**
अमर समृध्दी कॉम्प्लेक्स, आकाशवाणी केंद्राजवळ, सोलापूर रोड, हडपसर,
पुणे - ४११ ०२८. फोन : ०२०-३२५१७६७१

**सिंहगड रोड**
सर्व्हे नं. १९/१७, आनंद नगर, सोमनाथ दुग्धालयाजवळ, सिंहगड रोड,
पुणे - ४११ ०५१. फोन : ०२०-३२५३११०२

**चंदननगर**
बेंद्रे बिल्डींग, पहिला मजला, सर्व्हे नं. ४६/१, संघर्ष चौक, खराडी रोड, चंदननगर,
पुणे - ४११ ०१४. फोन : ०२०-३२३११७२२

प्रेषक :

पारिजात को - ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई
पारिजात भवन, प्लॉट नं १८, सेक्टर १० ए,
नेरुळ (प.), नवी मुंबई - ४०० ७०६.
फोन : ३२५९६९९०/२७७०५१२७

बुक - पोस्ट

प्रति,